समाजाची मानसिकता घडविण्यात वाङ्मय सतत हातभार लावत असते. पण समाजातून लेखकालाच गायब केले तर? समाजात जे जे घडेल त्या साऱ्याची साक्षी *ब,बळीचा* ही कादंबरी आपल्यासमोर ठेवते. *ब,बळीचा* कादंबरीतील लेखक कळाण्या कोणकेरी गायब झालेला आहे? गायब केलेला आहे? तो जिवंत आहे? जिवंत असेल तर त्याचा ठावठिकाणा काय? नसेल तर त्याला मारला कोणी? एका संवेदनशील माणसाला जगायला या वर्तमानात जागा आहे काय?, असे शोधताना कोणकेरीचे कुटुंब, नातेसंबंध, गोतावळा, नोकरीचे ठिकाण, मित्र, भोवतालचा समाज, लोकशाहीतील कल्याणकारी राज्य, प्रशासनव्यवस्था, शेती, शेतकरी, शिक्षण, आरोग्य, धर्म, निसर्ग, प्राणी, पक्षी यांविषयी डायरी, नोंदी, पत्रे इत्यादीतून कोणकेरी कोणते तपशील नोंदवून ठेवतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. कोणकेरीच्या जाण्याची दिशा कोणती, हा प्रश्न आजचा समाज पुढे नेमका कोणत्या दिशेला जाणार, या प्रश्नाशी जोडला जातो. आणि वाचकाच्या मनात कादंबरी पुन्हा नव्याने सुरू होते. अशा या मराठी साहित्यविश्वातील एका नव्या वळणाच्या कादंबरीची सांगोपांग व साक्षेपी समीक्षा करणारा हा उल्लेखनीय ग्रंथ आहे. कादंबरी अभ्यासकांना हा ग्रंथ निश्चितच उपयुक्त ठरेल.

- *प्रस्तावनेतून*

ब-बळीचा विषयी... शरयू आसोलकर दर्या प्रकाशन, पुणे.

# ब-बळीच्या विषयी...

शरयू आसोलकर



# ब, बळीचा विषयी

संपादक
शरयू आसोलकर

प्रकाशन

# अनुक्रमणिका


- प्रास्ताविक ७

१. ब,बळीचा : विमर्शक कादंबरीचा अनोखा प्रयोग
रमेश नारायण वरखेडे १३

२. ब,बळीचा : कादंबरीबद्दल
दिगंबर पाध्ये ४०

३. ब,बळीचा : एक भारतीय पेच
अशोक बाबर ५२

४. गावाच्या उद्ध्वस्तीकरणाची गोष्ट : ब,बळीचा
आसाराम लोमटे ८०

५. गाव, शेतकरी आणि मानवी मूल्यात्म ऱ्हासाचा नकाशा
कैलास अंभुरे ८९

६. ब,बळीचा : अर्थात 'शेतकऱ्यांसहित शेतकीची हल्लींची स्थिती'
नंदकुमार मोरे ११०

७. प्रयोगाच्या विविध शक्यता शोधणारी कादंबरी
महेंद्र कदम १२४

८. ब,बळीचा : नवतंत्र, शैली आणि वास्तव
सोमनाथ बरूरे १३४

९. ब,बळीचा : उफराळीत अडकलेल्या कृषिसंस्कृतीची शोकान्त गाथा
सुशील धसकटे १४२

१०. ब,बळीचा : गावगाड्याच्या ऱ्हासाची शोकांत पटकथा!
प्रमोद मुनघाटे १५३

११. वेगानं घडणाऱ्या मूल्यऱ्हासाची गोष्ट
मनोहर जाधव १६०

१२. ब,बळीचा मधील जोतीरावांशी साधलेला पत्रसंवाद
नीला जोशी १६३

१३. ब,बळीचा : कृषिजन संस्कृतीच्या मूल्यव्यवस्थेची पुनर्मांडणी
दत्ता घोलप १७२




# प्रास्ताविक

राजन गवस यांची *ब,बळीचा* ही कादंबरी इ. स. २०१२ साली प्रसिद्ध झाली. त्यांच्या या कादंबरीने सर्वांचेच लक्ष वेधले. या कादंबरीवर अनेकांनी सविस्तर टीकालेखन केले. यातील निवडक लेखांचे संपादन या ग्रंथात करण्याचे योजिले आहे. राजन गवस यांनी मोजकेच पण महत्त्वाचे कादंबरी लेखन केलेले आहे. त्यांची *चौडकं* ही कादंबरी १९८५ प्रसिद्ध झाली. विषयाच्या नाविन्यामुळे या कादंबरीकडे सर्वांचेच लक्ष वेधले. त्यानंतर *भंडारभोग* (१९८९) ही कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरीत पहिल्यांदाच तृतीयपंथीयांचे जग वाचकांसमोर आले. व्यवस्था मग ती कोणतीही असो, माणसाला नपुंसक कशी करते याचे चित्रण या कादंबरीत अत्यंत प्रभावीपणे आलेले आहे. या कादंबरीची दखल घेतली, पण या कादंबरीवर लिहिले मात्र गेले नाही. *भंडारभोग* कादंबरी पूर्णतः व्यक्तिवर्तनाचे मानसशास्त्रीय आकलन मांडते. तायाप्पा हा साधासुधा माणूस धर्मव्यवस्थेच्या अनाकलनीय दडपणातून हळूहळू आपले पुरुषत्वच गमावून बसतो. त्याच्या वर्तनाचे सूक्ष्म पदर या कादंबरीत सखोलपणे चित्रित झालेले आहेत. गवस यांची *धिंगाणा* (१९९१) ही कादंबरी खेड्यातील बदलत्या राजकारणाचा वेध घेते. राजकीय अड्डेबाजीने खेड्याचे केलेले उद्ध्वस्तीकरण या कादंबरीत नेमकेपणाने येते. यानंतर *कळप* (१९९७) ही कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरीची चर्चा *कोसला*च्या प्रभावाची कादंबरी म्हणून अधिक झाली. या आधीच्या गवस यांच्या कादंबऱ्या स्वतंत्र असूनही त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांवर नेमाडे प्रभावाची चर्चा अधिक जोरकसपणे सुरू झाली. असे का झाले असावे? या प्रश्नाकडे गेल्यास गवस यांच्या *चौडकं, भंडारभोग, कळप* या कादंबऱ्यांचे आकलन न करताच ही शेरेबाजी उदयास आल्याचे सप्रमाण आपल्याला सिद्ध करता येते. *चौडकं, भंडारभोग, धिंगाणा* या तिन्ही कादंबऱ्या खेड्यातील अंधश्रद्धा, व्यक्तिवर्तनाचे मानसशास्त्रीय आकलन